<u>नियमित दिवाणी दावा क्र.६२/२०१४ मधील नि.क्र. ६८ वरील आदेश</u>
**(CNR NO MHRG07-000154-2014)**

१. सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ वासुदेव धर्मा मसणे यांचे वारसांना दाव्यात सामील करण्याकरीता दाखल केला आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ४ तर्फे निशाणी ७० वर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, वादींनी जाणूनबुजून वेळ वाया घालविण्याचे हेतूने प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्यास टाळाटाळ केली आहे. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.१ वासुदेव धर्मा मसणे हे दि.२३/०३/२०१६ रोजी मयत झाले असून त्यांचे मृत्युपासून ९० दिवसांचे आत त्यांचे वारसांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र. १ चे मृत्युची माहिती सदर वादींना दिनांक २१.०२.२०२२ रोजी प्रतिवादीतर्फे वकीलांनी दाखल केलेल्या पुरशीसमुळे समजली आहे. तरी, न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी क्र.१ वासुदेव धर्मा मसणे यांचे वारसांना दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामील करणे गरजेचे आहे. मयत प्रतिवादी क्र.१ वासुदेव धर्मा मसणे यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे १ श्रीमती लक्ष्मीबाई वासुदेव मसणे (पत्नी), २ श्री. अनंता वासुदेव मसणे (मुलगा), ३ श्री. गणेश वासुदेव मसणे (मुलगा) व ५ सौ.अंजली मंगेश सावंत (मुलगी) हे वारस आहेत. सदरचा दावा ठरावाकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ वासुदेव धर्मा मसणे

यांचे अर्जात नमूद वारसांना अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादींनी विहीत कालावधीत दाव्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ३. | वादी यांनी दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

SUJATA RAM SHINDE
Digitally signed by SUJATA RAM SHINDE
Date: 2023.07.19 15:10:30 +0530

ठिकाण – कर्जत (सुजाता रा. शिंदे)

दिनांक – १७/०७/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कर्जत.